School Bldg. P.No 1

# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

## अग्निशमन व आणीबाणी सेवा

श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडियम, नांदेड, दुरध्वनी क्र. 101,02462- 255555, फॅक्स क्र. 02462-232071
www.nwcmcnanded.gov.in. / email:-nwmccorporation.yahoo.in

जा.क्र. नांवाशमनपा/अवअसे/ 2136 /23, दिनांक 12/ 01 /2023

:: सुधारीत प्रस्तावानुसार ::

प्रति,
श्री केशव रामय्या गड्डम व सौ. शिला रघुनाथ वरक्कल,
कौठा, नांदेड.

विषय:- ' तात्पुरते नाहरकत प्रमाणपत्रा ' बाबत.

संदर्भ:- 1) नगररचना विभाग नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांचे पत्र
जा.क्र. नावाशमनपा/ नरवि/1542, दिनांक 20/03/2018.
2) जा.क्र.नांवाशमनपा/अवअसे/141/18, दि.20.04.2018 अन्वये तात्पुरते नाहरकत प्रमाणपत्र
3) नगररचना विभाग नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांचे पत्र
4) संबधीताचा अर्ज दिनांक 14.07.2020.
5) जा.क्र.नांवाशमनपा/अवअसे/296/20, दि.29.07.2020 अन्वये तात्पुरते नाहरकत प्रमाणपत्र
जा.क्र. नावाशमनपा/ नरवि/1237/172021-22, दिनांक 30/12/2022.

सदर इमारतीचा विकासक अथवा मालक यांनी नगररचना विभाग नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांचेकडे सादर केलेल्या नकाशा नुसार बांधकामाचे क्षेत्र हे तात्पुरत्या स्वरुपाचे असुन त्यामध्ये नगररचना विभागाकडुन बदल होण्याची संभावना आहे.

इमारतीचा तपशिल आपण दिलेल्या नकाशानुसार खालील प्रमाणे आहे.

शैक्षणिक इमारत (SCHOOL BUILDING)

| अ. क्र. | भुखंडाचे क्षेत्रफळ | (नविन प्रस्तानुसार) | बांधकामाचे एकुण क्षेत्रफळ | इमारतीची उंची | अ क्र | भुखंडाचे क्षेत्रफळ | (जुन्या प्रस्तानुसार) | बांधकामाचे एकुण क्षेत्रफळ | इमारतची उंची |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 5994.60 चौ. मी. | विद्या तळ मजला (क्लास रुम) | 1342. 84 चौ. मी. | 03. 0 मी | 1 | 5994. 60 चौ. मी. | विद्या तळ मजला (क्लास रुम) | 1342. 84 चौ. मी. | 3.0 मी |
| | | प्रस्ता.तळ मजला (क्लास रुम) | 0636. 38 चौ. मी. | | | | विद्य.पहिला मजला (क्लास रुम) | 1342. 84 चौ. मी. | 3.0 मी |
| | | विद्य. पहिला मजला (क्लास रुम) | 1342. 84 चौ. मी. | 03.0 मी | | | प्रस्ता पहिला मजला (क्लास रुम) | 0636. 38 चौ. मी. | |
| | | विद्य. पहिला मजला (क्लास रुम) | 0636. 38 चौ. मी. | | | | प्रस्ता दुसरा मजला (क्लास रुम) | 1979. 22 चौ. मी. | 3.0 मी |
| | | प्रस्ता दुसरा मजला (क्लास रुम) | 1342. 84 चौ. मी. | 03. 0 मी | | | एकुण बांधकाम | 5301. 28 चौ. मी. | 9.0 मी |
| | | एकुण बांधकाम | 5301. 28 चौ. मी. | 09. 0 मी | | | | | |

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने श्री केशव रामय्या गड्डम व सौ. शिला रघुनाथ वरक्कल, यांचा प्लॉट क्र. 01, गट क्र.98 (भाग), सर्व्हे क्र. 24, कौठा, नांदेड, येथे बांधण्यात येणा-या / आलेल्या शैक्षणिक या इमारतीसाठी ' तात्पुरते नाहरकत प्रमाणपत्र ' खालील अटींच्या व शर्तीच्या अधीन राहुन देण्यात येत आहे.

1. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील कलम 3 व भारतीय राष्ट्रीय इमारत संहीता 2016 च्या सुधारणेसह अमलबजावणी करावी.
2. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील कलम 10 नुसार सर्व अग्निशमन उपाययोजना करण्याची जबाबदारी आपणावर राहील.
   अ. जर मुख्य अग्निशमन अधिकारी सादर इमारतीत अग्निशमन उपाययोजना बाबत समाधानी नसेल तर इमारतीत अग्निशमन बाबात आवश्यक त्या उपायोजना मान्यता प्राप्त संस्थे मार्फत करुन घेण्याची जबाबदारी आपणा वर बंधनकारक राहील.

(मागे पहा..)

Scanned with OKEN Scanner

ब. आपल्या इमारतीमध्ये आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत असे प्रमाणपत्र स
मान्यता प्राप्त संस्थे मार्फत प्रमाणपत्र नमुणा " अ " मध्ये व लावलेल्या साहित्याची यादीसह साद
आपणास बंधनकारक राहील.

3. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 व भारतीय राष्ट्रीय इमारत संहिता 20 कायद्या अंतर्गत अर्जदाराने अटीची पुर्तता न केल्यास सदर इमारतीचा विकासक, मालक, भाडेकरु व भोगवटादार जो कोणी असेल भविष्यात होणा-या हानीस जबाबदार राहील.
4. संबधीत अग्निशमन प्रतिबंधकात्मक उपाययोजनेसाठी आवश्यकती माहिती हवी असले तर संबधीताने www.Mahafire services.org. या संकेत स्थळावर पहावे.
5. सदर इमारतीच्या ठिकाणी अग्निशमन वाहणास व दलास पोहचण्यासाठी आवश्यकती जागा व रस्ता असणे बंधनकारक राहील.
6. सर्व आवश्यक ते अग्निशमन प्रतिबंधकात्मक साहित्य जसे की, सीओटु/ ड्रिसीपी, फोम, फायर बकेट आय एस: 2190/15683 मार्क च्या दर्जाचे असणे बंधनकारक राहील.
7. सर्व अग्निशपमन प्रतिबंधात्मक साहित्य हे सुस्थितीत तसेच तात्काळ उपलब्ध होईल अशा ठिकाणी ठेवणे बंधनकारक राहील.
8. आपातकालीन दुरध्वनी क्रमांक जसे पोलीस- 100, फायर - 101, 02462-252555 अम्ब्युलन्स -102 संबधीत इमारतीच्या दर्शनी भागामध्ये लावणे बंधनकारक राहील.
9. सदर इमारतीमध्ये आवश्यक ती स्वच्छता बाळगणे बंधनकारक राहील.
10. सदर इमारतीमध्ये उष्णता वर्धक काम करावयाचे असल्यास संबधीत अधिका-याची परवानगी घेणे बंधनकारकराहील.
11. भविष्यामध्ये संबधीत इमारतमध्ये वाढ, दुरुस्ती अथवा इतर कोणताही बदल करावयाचा असल्यास त्या बाबत या विभागाची परवानगी घेणे बंधनकारक राहील.

<u>खालील तक्यात दर्शविल्याप्रमाणे अग्निशमन प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे बंधनकारक राहील</u>

| अ. क्र. | अग्निशमन साहित्य | आवश्यकत्या गरजा | तरतुदी | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | अग्निशामक (Portable fire Extinguishers) | आवश्यक | – | As per IS:2190 |
| 2 | होज पाईपची गुंडाळी (Hose Reel) | आवश्यक त्या ठिकाणी | इमारती च्या प्रत्येक भागात | सदर इमारतीच्या पाणी पुरवठयाला लागुनच होजरील 19 एमएम आकाराच्या कमी असुन नये तसेच ती R I. S. 884.1985 नुसार प्रमाणीत असावी. |
| 3 | आद्र उन्मीग (Wet Riser) | आवश्यक | इमारतीत | — |
| 4 | यार्ड नळखांब | आवश्यक | आवश्यक | R. I.S. 884: 1985 च्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे तसेच अग्निशमन प्रतिबंधात्मक अंतर्गत सुरक्षा देणेसाठी किमान 2 च्या संख्या I.S. 14933-2001च्या मानांकनाचे असणे गरजेचे आहे. |
| 5 | हस्त चलीत इलेक्ट्रिक भय सुचना यंत्रणा (Manually Operated Electric Fire Alarm System) | आवश्यक | — | संपुर्ण प्राधिकरण |
| 6 | स्वंयचलीत तपास व भय सुचना यंत्रणा (Automatic Dection And Alarm System) | आवश्यक | — | संपुर्ण प्राधिकरण |
| 7 | स्वंयचलित तुषार यंत्रणा ( Automatic Sprinkler system) | आवश्यक | इमारती मध्ये | स्वय चलित तुषार यंत्रणा IS- 15105 च्या प्रमाणे निर्मित व दिलेल्या निर्देशानुसार स्थापित करणे बंधनकारक. |
| 8 | पाणी साठविण्याची भुमीगत टाकी. ( Underground Static Storage Tank) | किमान 25,000 लिटर क्षमतेची टाकी आवश्यक | — | पाणी साठा फक्त अग्निशामक प्रतिबंधात्मक उपाययोजनासाठी वापरात आला पाहीजे. |
| 9 | गच्चीवरील पाण्याची टाकी (Terrace Level Tank) | किमान 10,000 लिटर क्षमतेची आवश्यक | — | — |
| 10 | फायर पंप ( Fire Pump) जॉकी पंप (Jockey Pump) हे पंप स्वंयचलीत प्रणालीवर ठेवण्यात यावा. | फायर पंप- 900 Lpm , जॉकी पंप- 180 Lpm विद्युत पुरवठयावर चालणारा पंप | — | Fire Pump 900 Lpm, and one electric Jokey Pump of capacity 180 Lpm, one fire pump at the terrase Tank level with pressure of 3.5 Kg/cm2. |

Scanned with OKEN Scanner

## ना भारतीय राष्ट्रीय इमारत संहिता - 2016 च्या प्रमाणे अंतर्गत जिन्या बाबत मार्ग दर्शक सुचना.

1. अंतर्गत जिन्या जवळ कुठल्याही प्रकारची गॅस पाईप लाईन असु नये.
2. प्रतेक मजल्याचे बांधकाम क्षेत्रफळ 500 चौ. मी पेक्षा जास्त असल्यामुळे इमारतीत दोन जीने असणे बंधनकारक आहे.
3. हे दोनही जीने बंदिस्त असतील व त्यातील एक जीना इमारतीच्या बाहेरील बाजुस असावा व तो इमारतीच्या आवारात म्हणजेच इमारतीच्या सिमांतिक अंतरात सुरक्षित ठिकाणी उघडणे अपेक्षित आहे.
4. याव्यतीरिक्त भारतीय इमारत संहिता 2016 मधील भाग 4 मध्ये दर्शविल्या प्रमाणे जिण्यांची व्यवस्था करण्यात यावी.
5. जिन्या जवळ कुठल्याही प्रकारची राहण्याची जागा, भांडार किंवा तत्सम जागा तसचे ज्वालाग्राही पदार्थ असुन नयेत.
6. बाहेर पडण्यासाठी दिशा दर्शकबाण हे जमीनीपासुन 1.5 मीटर इतक्या उंचीवर असावेत तसेच चमकदार (Fluresent paint) असावेत व ते कुठल्याही परिस्थीतीत खराब होणार नाहीत जसे की कुठल्याही प्रकारचे साहित्य नेल्यावर रेषा उमटु नयेत किंवा खराब होणार राहीत.

## वखारी बाबत मार्गदर्शक सुचना

1. भांडारगृहातील साठा योग्य त्या पध्दतीने ठेवणे, योग्य ते रस्ते व इतर मार्ग हे पिवळया रंगाने दर्शविण्यात यावेत आणि हे कुठल्याही अडथळयाच्या ठिकाणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
2. भांडारगृहात ठेवण्यात येणा-या साठया बाबत उंची लाल रंगाने भिंतीवर दर्शविण्यात यावी व त्या रेषेच्यावर साठा करण्यात येवु नये. लाल रेषा हि छतापासुन 1.5 मीटर खाली असावी.
3. सर्व विदयुत साहित्य अग्नि अवरोधक व तत्सम आय एस दर्जाचे असावेत व साठा दर्शवि-या लाल रेषावर असावेत.
4. Exits, Fire Escape दर्शविणारे चिन्ह हे चमकदार अक्षरात अंधारात देखील दिसतील असे असावे.

## विदयुत सेवा.

1. विदयुत पुरवठा करणारे वायर स्वतंत्र नळीमधुन गेलेले असले पाहिजे सर्व नळया हया एका नंतर एकच्या मजल्यावर अग्नि अवरोधक साहित्याने बनवलेल्या असाव्यात.
2. विदयुत पुरवठा करणा-या नळया मधुन पाण्याचे पाईप टेलीफोनचे वायर, इतर फोनचे वायर, गॅस पाईप किंवा इतर कुठलेही वायर असु नये.
3. पाण्याचे पंप, चढण्या उतरण्याचा जिना, मोकळया जागे मधील विदयुत पुरवठार यासाठी स्वतंत्र लाईन टाकलेली असावी. जेणे करुन अग्निशमन सर्कीटवर परिणाम होणार नाही.
4. धोका, धुमपान, निषेधबोर्ड, ट्रान्सफार्मर स्विच यार्डच्या गेटवर बसविलेले असावे.

## इमातीमध्ये जागेसाठी मार्गदर्शक सुचना.

सुलभ हाताळण्यासारखे अग्निशमन साहित्य तपासणीच्या वेळी दर्शविण्यात आलेल्या ठिकाणी ठेवलेले असले पाहिजे जासे की, सी.ओ.टु/डि.सी.पी. फोम, फायर बकेट हे साहित्य हे सत्सम आय.एस. दर्जाचे असावे सर्व अग्निशमन साहित्य हे सुस्थितीत असणे बंधनकारक राहील व आपात काळामध्ये तात्काळ उपलब्द असणे बंधनकारक राहील.

या व्यतीरिक्त डिसी रुल्स मधील सर्व तरतुदी आणी एन.बी.सी 2016 मधील अटी व शर्तीची पुर्तता करणे बंधनकारक आहे.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील सर्व अटी व शर्तीची पुर्तता करणे बंधनकारक आहे. तसेच या मध्ये भविष्यात होणा-या सर्व बदलांची पुर्तता करणे तसेच नियोजितवाढ किंवा इमारतीचे हस्तांतरणासाठी या विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र घेणे गरजेचे आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नगररचना विभागाकडुन सदरील इमारतीस बांधकाम परवानगी मिळाल्यानंतर त्याची एक प्रत (बांधकाम नकाशा व परवाना) अग्निशमन विभागात देण्यात यावा. म्हणजे त्यामधील बदलानुसार पुढील कार्यवाही करण्यास सुचित करण्यात येईल.

आग प्रतिबंधात्मक यंत्रणा बसविण्यापुर्वी शासन नोंदणीकृत अभिकरणाकडुन त्याचा नकाशा अग्निशमन विभागाकडे सादर करावा लागेल.

महाराष्ट आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 नुसार लावण्यात येणारी अग्निशमन सेवा फी/ मनपा फीस नजर चुकीणे कमी लावण्यात आल्यास, नगररचना विभागाकडुन मंजुर नकाशात बांधकामाचे क्षेत्रफळ वाढल्यास होणारी फरकाची रक्कम ना हरकत प्रमाणपत्र घेते वेळेस भरावी लागेल.

Scanned with OKEN Scanner

या सर्व बाबींची पुर्तता केल्यानंतर या कार्यालयाचे प्रतिनिधीने तपासणी केल्यानुर समाधानकारक तपासणी झाल्यानंतर ' नाहरकत प्रमाणपत्र 'देण्यात येईल. तसेच दर वर्षी अग्निशमन नाहरकत प्रमाणपत्र घेणे आपणास बंधनकारक राहील.

संवैधानिक तरतुदीमध्ये वारंवार होणा-या बदलास अधिन राहुन या मध्ये अतिरिक्त सुचना देण्याचा अधिकार सदर स्वाक्षरीकर्त्याने राखुन ठेवण्यात आला आहे.

हे ' तात्पुरते नाहरकत प्रमाणपत्र ' असुन जे की, वितरीत केलेल्या तारखेपासुन एका वर्षापर्यंत वैद्य राहील अथवा बांधकाम पुर्ण होईल या मधील जो कालावधी कमी असेल त्या कालावधी नंतर नाहरकत प्रमाणपत्र घेण्याची जाबाबदारी आपणास बंधनकारक राहील.

अग्निशमन अधिकारी
अग्निशमन व आणीबाणी सेवा
नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड.

<u>प्रतिलिपी माहितीस्तव सविनय सादर</u>

1. मा.सहा. संचालक नगररचना, नगररचना विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना देवुन सुचित करण्यात येते की, हे नाहरकत प्रमाणपत्र तात्पुरत्या स्वरुपाचे असुन या इमारतीत आवश्यक अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे, याचे प्रमाणपत्र अग्निशमन विभागाकडुन प्राप्त झाल्यानंतर संबधीतांना इमारतीचा भोगवटा प्रमाणपत्र (Occupation Certificate)देण्यात यावे.

Principal
Nagarjuna Public School
CBSE Affiliation No 1130310